# भोगलेल्या दुख:ची अस्वस्थ करणारी कहाणी

**प्रा.डॉ.बापू जी घोलप**
**मु.पो. लिंबागणेश, ता.जि.बीड. ४३११२६**
**भ्रमनध्वनी : ७५८८०५७६९५**

१९९० नंतरच्या स्त्रीयांच्या आत्मचरीत्रात खास मानाचा मुजरा करावा लागेल तो २००८ साली प्रकाशित झालेल्या आशा अपराद यांच्या 'भोगले जे दु:ख त्याला' हया आत्मचरित्रास. या लेखातील ही सर्वोत्कृष्ट कलाकृती ठरु शकेल. हे मोलाचे लिखाण असून स्त्री वाङ्मयातला तो हिमालय ठरेल. स्त्री आत्मचरित्र लेखनातला एक मैलाचा दगड ठरेल. 'माझ्या आयुष्याच्या खडतर वाटचालीत माझ्याशी जात-धर्म, वर्ग,लिंगभेदाच्या पलीकडलं नातं जोंडून जे पाथेय समाजाने मला दिले त्या प्रेमळ हातांना अत्यंत कृतज्ञातापूर्वक..' अर्पण अशी ओजस्वी आणि भव्य व्यापक भावना व्यक्त करणरी अर्पण पत्रिका सलामीलाच वाचकांना आपलं करुन टाकते. ह्य आत्मचरित्राचे शिर्षक फार बोलके असून जे दु:खाचे कढत कढत कढ स्त्रीने सोसले तिलाच त्याची वेदना कळू जाणे असे त्या म्हणतात. अगदी आत्मचरित्राचे मुखपृष्ठही अत्यंत बोलके असुन तबकात भरलेल्या उष्ण विस्तवातून निखाऱ्यातून स्वातंत्र्याचा पांढरा पक्षी उत्तुंगतेची झेप घेतो आहे असे त्यात सूचवले आहे.

आशा अपराद यांना पराकोटीची सहनशक्ती दाखवावी लागलेली अहे. सहजीवनात स्त्री किती आणि कसा कसा संसारगाडा ओढते हे त्यांच्याकडे बघून सांगावे. आईचा आधार नाही तर आई ही मूळ मुख्य वैरीणी ठरलेली. नवरा बोथट मनाचा  ड्रायव्हर होता. अगदी गरोदरावस्थेत देखिल पत्नीच्या भावना तो जाणून घेवू शकला नाही. आशाताई लिहितात की, 'सातव्या महिन्यात असताना त्यानं मला जवळजवळ हाकलल्यासारखंच गडहिंग्लजला धाडलं अशा अवस्थेत तिकडं जाणं मला नकोस वाटत होतं. ट्रकमधून जाताना मी माझ्याच विचारात. असं असतं का नातं? केवळ शरीर सुखासाठी एकत्र येणं म्हणजे पती-पत्नी का? एकमेकांच्या भाव-भावना सुख-दु:ख ऱ्हदयाची स्पंदनं कळत नाहीत तर काय अर्थ आहे हया नात्याला?  मला काय वाटतं हे  शब्दात सांगायची गरज आहे काय? पण मला वाटतं आणि ह्यांना समजणं हयात दोन ध्रूवाचं अंतर होतं.' एवढा दोघांतला फरक असूनही त्यांनी त्याची सोबत केली. जीव जाईपर्यंत मारलं. उपाशी ठेवलं. मानसिक छळाची परिसिमा गाठली. तरी आशा जीवंत राहिली. हा सहजीवनाच्या चिवटतेचा कि स्त्रीच्या शोषिकतेचा इतिहास आहे. हे आत्मचरित्रातील प्रसंग न प्रसंग वाचल्यावर कळते शेवटी घर उभं केलं. माणूसपणात कुटूंबाला रुप आणलं तेंही केवळ आशाताईंच्या अथक मेहनतीमुळेच.

पती निवडी बाबत आशा अपराद यांची कथा हृद्य असून त्यांना त्यांच्या आईने बळजबरीने बीजवर नापसंद अशा ट्रक ड्रायव्हरशी लग्न लावून दिले असून ते लग्न होते, की मारामाऱ्या ,भांडणतंटे आयोजित कार्यक्रम होता असा प्रश्न पडण्याजोगे वर्णन लेखिकेने केले आहे. ७जून १९६७ला ११.३० वा. त्यांची गाठ पडला. ती आमावस्या होती. लेखिका आशा इस्माईल देसाईची सौ.आशा दस्तगीर अपराध झाली. पण तिला कवडीचेही पती सुख मिळाले नाही. इत्यंभूत त्यांच्या साऱ्या साऱ्या स्वप्नांची राखरांगोळी झालेली आहे. संसारात भयंकर उलथापालत झाली व शेवटच्या काही वर्षात लेखिकेने स्वत:चे विश्व स्वत: स्थिर केले आहे.

नौकरी लागली चार मुली झाल्या उत्तरायुष्यात उतरणीवर आशाताईंच्या सहजीवनात थोडासा फरक पडलेला दिसतो. सगळा नाही पण अल्पसा समजूतदारपणा नवऱ्यात आला. त्या म्हणतात, ह्यांच्या स्वभावात थोडाफार बदल जाणवत होता. आपली पत्नी या नात्यानं ती आपल्याकडून काही अपेक्षा ठेवते. घराची काही अडचण सांगते. काही सूचवते. ते योग्य असतं या हेतूनं थोडफार ऐकून घेत. वाढत्या वयातील चार मुलींची आई, पूर्वीसारखं टोचून चालणार नाही, या जाणिवेतून असेल माझी हेटाळणी उपेक्षा बरीच कमी झाली होती. त्यामूळच त्यांना आमची वैयक्तीक

अडचण, कूचंबणा लक्षात आली आणि तातडीनं संडास,बाथरुमची व्यवस्था करुन घेतली. जीवनात ज्या दिवसात समजून घ्यायचं ऐकमेकांचे व्हायचं, त्याच दिवसात दुरावा झाल्यावर त्या नवलाईचा अनुभव आहे. फार दु:ख व पतीकडून दु:स्वास सोसल्यावर उतरायुष्यात काही गोडी नसताना जवळ येण्याला कितपत किंमत राहते, असाही प्रश्न त्या उपस्थित करतात.

आशा अपराद यांना ही लाख संकटे झेलीत जिद्द चिकाटीच्या बळावर उच्च शिक्षण पूर्ण केले व प्राध्यापक म्हणून नौकरी मिळविली . काही दिवस तात्पूरत्या कनिष्ठ प्राध्यापक नंतर त्या वरिष्ठ प्राध्यापक झालेल्या आहेत. एम. फिल. करताना गाईडने केलेला छळ आणि त्याच्या आशाताई कडून काही वेगळया अपेक्षा असल्याचा सविस्तर तपशिल त्या न भीता देतात. अगोदर तर घरातून शिक्षणास भयंकर विरोध. रस्त्यावर बसून भिकाऱ्यासारखा अभ्यास केला. तरी पत्नी सुशिक्षीत झाल्यावर नवऱ्याची तिच्या श्रेष्ठत्वामूळे घालमेल झाली. त्यांचा पदर पडण्यावरुन, उशीरा येण्याजाण्यावरुन तो बोलू लागला, हाणमार, टोचणी त्याच्या प्रसंगाने आशा यांनी भोगले जे दु:ख त्याला लिहीले आहे. यात आपले शिक्षक आणि विशषेत: प्राचार्य लीला पाटील यांचे त्यांनी सहकार्याबदल लाख लाख आभार मानले आहेत. ह्या मनस्तापात त्यांना हिस्टेरीयाचे झटके येत होते. नौकरीवर निवड होवूनही कार्यालयातील लिपीक लोक कायम होण्याची ऑर्डर देण्याचे टाळत होते. दुसऱ्या उमेदवारासाठी डावलले जाते. ज्या शाळेत शिकली त्याच शाळेत शिक्षिका झाल्याचाही प्रांजळ आनंद त्यांनी दिला आहे. तसेच आपल्याच मुलींना त्या कॉलेजात शिकवणारी ती प्राध्यापिका ठरते. हयाचेही नाविण्य त्यांनी नोंदवलेले आहे. खऱ्या अर्थाने त्यांना शिक्षणाने व नोकरीनेच माणूसपण दिले आहे. आत्मचरित्राचा उत्तरार्ध संपूर्णत: हयाच अनुभवंनी व्यापलेला असून तो उत्तम रितीने लेखिकेने मांडला आहे. आशा अपराद यांनी स्वत: स्त्री म्हणून तर खूप सोसलं पण समाजातल्या इतर स्त्रीयांची दु:खे हालकी करण्याच्या दृष्टीने त्यांनी कार्य केलेले आहे. त्याचप्रमाणे आशा अपराद यांनी लिला पाटील या थोर समाजकार्यकर्ती व शिक्षण तज्ञाच्या आधाराने परदेश प्रवासाचा प्रयत्न केला आहे.

आशा अपराद यांनी आपल्या मूलींना उच्च शिक्षण दिले. त्यांची लग्ने करताना त्यांच्या आयुष्याचा छळ लक्षात घेऊन त्यांनी स्त्रीवादी जावयाचा शोध केलेला आहे. त्या लिहीतात, आपल्या पत्नीचा आदर करणारा , दोघांच्या पैशातून संसार उभा करणारा, दोघांची स्वप्न पाहून ती स्वप्न प्रयत्नांनी साकार करणारा जोडीदार असावा, पत्नींचं प्रेम, अपेक्षा ओळखून हळूवार वागणारा, भौतिक साधन-सामग्रीपेक्षा माणूसकीनं श्रीमंत असणारा जावई मला हवा होता, सुदैवाने त्यांना असा सुज्ञ जावई सापडला व त्यांच्या मुली सुखी झाल्या. इतका स्वत:च्या अस्तिवाचा नष्टांश करणारा छळ होउनही स्त्री समाजासाठी झटते, स्त्रीयांच्या जीव-जन्माचा विचार करते यातच त्यांचे मोठेपण आहे.

आशा अपराद हया मुस्लिम समाजातील मराठी लेखिका आहेत. त्यामुळे त्यांच्या लेखनात जागोजाग हिंदी उर्दू, शब्दांचा खच्चून भरणा आढळतो. त्यायोगे हे आत्मचरित्र मराठीतील स्त्री लेखिकांच्या आत्मचरित्रास एक नवा उत्तुंग आयाम देते. भोगले जे दु:ख त्याला ह्या आत्मचरित्राच्या भाषाशैलीचा खास, स्वतंत्रपणे अभ्यास करावा असे त्याचे स्वरुप आहे. यामध्ये लेखिकेच्या प्रमाण मराठी भाषेत नजरेत भरण्याइतके वेगळेपण आहे. शिवाय मुस्लिम स्त्रीची भाषा व महाराष्ट्रीयण मुस्लिम समाज संस्कृती समजून घेण्यासाठी यात शेकडो उदाहरणे आहेत. लेखिका मनोगतात म्हणते की, मी आज विचार करते की मी जशी होते, किंवा जशी आहे, यामागं एक विशिष्ट समाज, माणसं संस्कार हे कारण आहे. मी ज्या हिंदु गल्लीत जन्मले, वाढले त्या संस्काराची खूप मोठी शिदोरी माझ्या सोबत आहे. माझी घडण किंवा मानसिकता केवळ, मुस्लिम अशी न होता भारतीय मुस्लिम अशी झाली त्यामागं त्या संस्कारांचं संचित आहे. जाती धर्म, वर्ग, लिंगभेदाच्या पलीकडील समाजाशी जडलेली ही नाती या नात्यांनी मला खूप प्रेम दिले, जगण्याची उमेद दिली जसे हया बाहेरच्या समाजाने प्रेम दिले त्यापेक्षा घरच्या रक्ताच्या नात्यांनी लेखिकेचा क्रूर छळ केला आहे. लेखिकेची आई मुलीचा छळ करीत असे. अपशकुनी, उजले पॉवाकी, काळुंद्री, चिपकली की मूँ की आणि असेच डागण्या देणारे शब्द उच्चारी. जसे, मेरे पॉवा पर नूर है सो तेरे मूँह पर हे . क्या देख रही चूप जलू नको. चपली की सुरत की आणि हे तर ए टॉगे के टप के मूँह मी म्हणूनच हाक मारु लागले होते.

आशा अपराद यांनी आपल्या दु:खद जीवनाची कथा सांगताना समकालीन समाज व रीतीरिवाजावर भाष्य केले आहे. मुस्लिम समाजातील दुष्ट प्रवृत्तीचा समाचार घेतानाच हिंदु धर्माच्या गौरवाचे उद्‌गार त्या काढतात. किंबहूना हिंदू-मुस्लिम एकतेचा फार मोठा विचार त्या सांगतात. हिंदूचा सण मुसलमानांची ईद तर धर्माच्याही भिंती असतात हे आम्हाला माहितच नव्हतं. आसपासच्या सगळ्यांची घरं काय किंवा मनं काय अगदी ऐसपैस लांब-रुंद अशीच होती. छोटया -छोटया पडद्‌या घालून केलेला कोंदट कबुतरखाना तेव्हा नव्हता, तेव्हा होती फक्त गल्ली. या कडेनं त्या कडेपर्यंत आणि त्यात एकमेकांना खेटून असलेली साधी, मातीची खापराची छतं असलेली, सारवलेल्या जमिनीची, मातीच्या अंगणात रांगोळ्या रेखाटलेली मिणमिणत्या दिव्यात प्रकाशणारी घरं आणि तशीच साधी मऊशार मातीसारखी विरघळणारी, जिव्हाळा पेरणारी मायाळू माणसं. या सगळ्यांमुळेच जगणं हवंहवसं वाटत राहीलं. माझ्या वैयक्तिक जीवनाच्या निराशेतही जगण्याची आशा चिवट राहिली.

स्त्री आत्मचरित्रांचा विचार करताना त्या आत्मचरित्राने समाजाला अथवा वंचितांच्या उन्नतीला काय दिले याचा विचार महत्त्वाचा आहे. आशा आपराद यांनी समाजाच्या उन्नतीला एक ऐक्याचा विचार तर दिला आहेच पण स्त्री जगण्याला एक ज्वलंत आशावाद दिला आहे. एक भविष्याची हिरवी ओढ दिली आहे. स्त्रीच्या जगण्याला एक ज्वलंत आशावाद दिला आहे. जिला कुणाला जन्मात आत्महत्या करण्याचा विचार डोक्यात येईल, त्या स्त्रीने भोगले जे दु:ख त्याला हे आत्मचरित्र वाचावे ही या आत्मचरित्राची मराठी साहित्याला मोठी देण आहे.

**प्रा.डॉ.बापू जी घोलप**<br>**मु.पो. लिंबागणेश, ता.जि.बीड. ४३११२६**<br>**भ्रमनध्वनी : ७५८८०५७६९५**